सकाळ

# आंतर विद्यापीठ कबड्डीस सोमवारपासून प्रारंभ

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; पाच राज्यांतील ६८ विद्यापीठांचा सहभाग

कोल्हापूर, ता. २२ : पश्चिम विभागातील आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धेचे (पुरुष गट) आयोजन शिवाजी विद्यापीठात करण्यात आले आहे. यामध्ये राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गोवा या पाच राज्यांतील ६८ विद्यापीठांचे संघ सहभागी होणार आहेत. २६ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत ही स्पर्धा होणार असून, उद्घाटन अर्जुन व छत्रपती पुरस्कारप्राप्त विजेते शांताराम जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये दिली.

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ''कबड्डी स्पर्धा विद्यापीठाच्या लौकिकात भर घालणारी आहे. यामुळे जिल्ह्यातील खेळाडूंनाही प्रोत्साहन मिळेल. खेळाडूंची आणि त्यांच्या प्रशिक्षकांची निवास आणि राहण्याची व्यवस्था चांगल्या प्रकारे केली आहे. यापूर्वीही अशा प्रकारच्या स्पर्धा विद्यापीठात झाल्या आहेत; मात्र या स्पर्धेच्या निमित्ताने पाच राज्यांतील संघ येथे येणार आहेत.'' इंचार्ज डायरेक्टर ऑफ स्पोर्टस पी. टी. गायकवाड म्हणाले, ''स्पर्धेचे उद्घाटन सोमवारी (ता. २६) दुपारी ४ वाजता विद्यार्थी भवनाजवळील ओपन



थिएटर येथे होणार आहे. हे सर्व सामने ए.आय.यू.च्या नियमानुसार मॅटवर होणार असून लोककला केंद्रामध्ये चार सुसज्ज मॅटिंग कोर्ट तयार करण्यात आले आहेत. सरावासाठी एक कोर्ट राखीव ठेवण्यात आले आहे. या स्पर्धेत पश्चिम विभागातील ६८ संघ, ८१६ खेळाडू आणि ५० पंच सहभागी होतील. या स्पर्धेच्या आयोजनात कोल्हापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन यांचे सहकार्य लाभले आहे. त्यांच्यातर्फे विजेत्या संघाला कायमस्वरूपी चषक देण्यात येणार आहे.''

पत्रकार परिषदेला शैक्षणिक सल्लागार डी. आर. मोरे, प्रकुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नानिवडेकर, वित्त अधिकारी व्ही. टी. पाटील, उप कुलसचिव व्ही. एम. शिंदे, डॉ. सुनील चव्हाण हे उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
23/11/2018 Page No. 7

पुढारी

# पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ पुरुष गटातील कबड्डी स्पर्धा सोमवारपासून

## ६८ विद्यापीठांच्या संघांचा सहभाग; २६ ते ३० नोव्हेंबर कालावधीत स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष गटातील कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत पश्चिम विभागातील ६८ विद्यापीठ संघांचा सहभाग आहे. या स्पर्धेचे उद्‌घाटन सोमवारी (दि. २६) सायंकाळी ४ वाजता ओपन एअर थिएटर येथे होणार आहे.

आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू आणि अर्जुन व शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त केलेले शांताराम जाधव यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्‌घाटन होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, या



स्पर्धेत विजेत्या प्रथम चार पुरुष संघांना कोल्हापूर जिल्हा कबड्डी संघटनेमार्फत कायमस्वरूपी चषक देण्यात येणार आहेत.

८१६ पुरुष खेळाडू, १३६ कोच आणि व्यवस्थापक आणि ५० पंचांचा या स्पर्धेत सहभाग असणार आहे. दि. २६ ते ३० नोव्हेंबर २०१८ या कालावधीत चालणाऱ्या या स्पर्धेचे आयोजन ए.आय.यू.च्या नियमानुसार होणार असून, सर्व सामने मॅटवर खेळले जाणार आहेत. स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या लोककला केंद्रामध्ये चार सुसज्ज मॅटिंग कोर्ट तयार करण्यात येणार असून, सरावासाठी दोन मॅटिंग कोर्ट तयार केली आहेत. स्पर्धा पार पाडण्यासाठी कोल्हापूर जिल्हा कबड्डी संघटनेने ४० सामना अधिकारी नियुक्त केले आहेत.

क्रीडा अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड म्हणाले, सांगता कार्यक्रम ३० नोव्हेंबरला सकाळी साडेदहा वाजता होणार असून या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू डॉ. शिंदे असणार आहेत. पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी उपस्थित होते.

लोकमत

## शिवाजी विद्यापीठात तयारी पूर्ण : ६८ विद्यापीठांतील ८१६ खेळाडूंचा सहभाग

# कबड्डीचा थरार सोमवारपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धा सोमवार (दि. २६) ते शुक्रवार (दि.३०) दरम्यान होणार आहे. त्यामध्ये पश्चिम विभागातील ६८ विद्यापीठांचे संघ सहभागी होणार आहेत. विद्यापीठाला या स्पर्धेचे तिसऱ्यांदा यजमानपद मिळाले आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजतर्फे (एआययू) ही पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा आयोजित केली आहे. यावर्षीच्या स्पर्धेचे यजमानपदाचा मान शिवाजी विद्यापीठाला मिळाला आहे.




विद्यापीठाने यापूर्वी दोनवेळा या स्पर्धेचे यजमानपद सांभाळले आहे. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या स्पर्धेचे उद्घाटन सोमवारी दुपारी चार वाजता 'ओपन एअर थिएटर'मध्ये कुलगुरु डॉ. शिंदे आणि आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू शांताराम जाधव यांच्या हस्ते होणार आहे. स्पर्धेत यजमान शिवाजी विद्यापीठासह मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर, अजमेर, ग्वाल्हेर, रोहतक, जबलपूर, आदी ६८ विद्यापीठांचे संघ असणार आहेत. त्यामध्ये प्रो-कबड्डीमध्ये खेळणारे कबड्डीपटू असणार आहेत. सकाळी सात ते दुपारी १२ आणि दुपारी चार ते रात्री आठ या वेळेत प्रत्येकी ४० मिनिटांचे सामने होणार आहेत. 'ए', 'बी', 'सी' आणि 'डी' या चार गटांमध्ये संघांची विभागणी केली आहे. बाद फेरीनंतर साखळी फेरीतील सामने होतील. रोज २४ सामने होणार आहेत. स्पर्धेचा समारोप शुक्रवारी होणार आहे. या पत्रकार परिषदेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

### 'मॅट'वर होणार सामने

**या स्पर्धेतील सर्व सामने 'एआययु'च्या नियमानुसार मॅटवर होणार आहेत. त्यासाठी विद्यापीठातील लोककला केंद्रात दोन मॅटिंग कोर्ट तयार केले आहेत. कोल्हापूर जिल्हा कबड्डी संघटनेचे ४० सामना अधिकारी नियुक्त केले आहेत. स्पर्धेतील विजेत्या प्रथम चार संघांना जिल्हा कबड्डी संघटनेतर्फे कायमस्वरुपी चषक देण्यात येणार आहे. स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात असल्याचे डॉ. गायकवाड यांनी सांगितले.**

### स्पर्धा दृष्टिक्षेपात

- संघांचा सहभाग : ६८
- सहभागी खेळाडू : ८१६
- प्रशिक्षक आणि व्यवस्थापक : १३६
- पंच : ५०

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचे संशोधन जागतिक दर्जाचे

## डॉ. डी. टी. शिर्के: विद्यार्थी, प्राध्यापकांसाठी संशोधनासाठी प्रोत्साहनपर योजना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ हे संशोधनाच्या बाबतीत महाराष्ट्रात क्रमांक एकचे विद्यापीठ आहे, तर जागतिक यूएस मानांकनात देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. विद्यापीठाचे संशोधन जागतिक दर्जाचे आहे. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी संशोधन करावे, नवप्राध्यापकांनीही संशोधनावर फोकस ठेवावा, यासाठी प्रोत्साहनात्मक योजना सुरू केल्या असल्याची माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

### संशोधन योजना राबवणारे देशातील एकमेव विद्यापीठ

आपले विद्यापीठ संशोधनासाठी नावाजलेले आहे. आगामी काळात संशोधनाची व्याप्ती वाढत राहण्यासाठी आम्ही विद्यार्थ्यांचा पाया भक्कम करत आहोत. पदवीचे शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रवृत्त करणाऱ्या योजना राबवणारे देशातील हे एकमेव विद्यापीठ असल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे संशोधनाबाबत आग्रही आहेत. यासाठी त्यांच्या मार्गदर्शनातून प्रोत्साहनपर उपक्रम यशस्वीपणे सुरू आहेत. विद्यार्थी पदवीचे शिक्षण घेत असतानाच त्यांच्यासाठी रिसर्च सेन्सटायझेशन या उपक्रमातून त्यांना मानधन दिले जाते. या योजनेत पन्नास महाविद्यालयांचा समावेश आहे. यासह पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही रिसर्च इनिसिएशन स्कीम सुरू आहे. यासह नवप्राध्यापकांनीही संशोधनात सहभाग घ्यावा, यासाठी त्यांच्यासाठी रिसर्च प्रमोट स्कीम सुरू करण्यात आली आहे. या योजनांतून संशोधनाला उत्तेजन म्हणून ठराविक रक्कम दिली जात आहे. यामुळे संशोधनाची गोडी निर्माण होत असल्याचे दिसत आहे. यावेळी विद्यापीठाचे अधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
23 NOV 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीसोबत संशोधनाला प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

पदवीचे शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना संशोधनाची गोडी लागावी या दृष्टिकोनातून शिवाजी विद्यापीठाने सुरू केलेल्या पदवीसोबत संशोधन या योजनेला प्रतिसाद देत कॉलेजस्तरातून ९४ संशोधन प्रकल्प विद्यापीठाला सादर करण्यात आहेत. यात ८० विद्यार्थी तर १४ प्राध्यापकांचा समावेश आहे.

दीड वर्षापूर्वी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी योजनेची घोषणा केली. पदव्युत्तर पदवीनंतर संशोधनक्षेत्रात विद्यार्थी मोठ्या संख्येने येतात. मात्र पदवीचे शिक्षण सुरू असताना विद्यार्थ्यांमध्ये संशोधन करण्यासाठी प्रोत्साहनाचे बीज रोवले जावे याहेतूने ही योजना कार्यान्वित करण्यात आली. गेल्या वर्षी योजनेंतर्गत महाविद्यालयीन स्तरातून ५० कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्पांची मांडणी केली होती. याबाबतचे प्रकल्प विद्यापीठाकडे पाठवले होते. यावर्षी योजनेच्या प्रतिसादात वाढ झाली असून ९४ प्रकल्पांतून वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संशोधन प्रबंध मिळाले आहेत.

संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या स्वनिधीतून कॉलेजसाठी दहा हजार रूपयांची आर्थिक तरतूद केली आहे. यामध्ये विज्ञान, वाणिज्य व कला या तीन शाखांमधील संशोधनविषयक विषयांमधील नव्या कल्पना, उपयोजित दृष्टिकोन समाजासमोर यावा यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याचे काम विद्यापीठ स्तरावर सुरू आहे. यासाठी विद्यापीठ प्रशासनाने ७५ लाख रूपयांची विशेष आर्थिक तरतूद केली आहे.'

## दरमहा विद्यावेतन

प्रमोशन फॉर रिसर्च या अभिनव उपक्रमाच्या माध्यमातूनही विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. पदव्युत्तर पदवी घेणारे जे विद्यार्थी एखाद्या विषयावर संशोधन करत आहेत त्यांच्या संशोधनाची प्रक्रिया एम. ए. पदवीनंतरही सुरू असेल तर त्यांना संशोधनासाठी अधिविभागात पुढील पाच वर्षे थांबण्याची परवानगी दिली जात आहे. यासाठी विद्यार्थांना दरमहा पाच हजार रूपयांचे विद्यावेतनाची सुविधा विद्यापीठाने दिली आहे.

## संशोधनासाठी सुविधांचा हात

विद्यापीठातील शिक्षकांसाठीही रिसर्च स्कीम राबवण्यात आली आहे. यासाठी यावर्षीपासून दोन ते पाच लाख रूपये अनुदान संशोधन करणाऱ्या शिक्षकांना निधी स्वरूपात देण्यात येणार आहे. तसेच क्वालिटी ऑफ रिसर्च या योजनेच्या माध्यमातून सध्या १२८ संशोधन प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. यासाठी दहा कोटींच्या अनुदानाची तरतूद केली आहे. विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या संस्थांमार्फत ९० टक्के निधी प्राप्त झाला आहे.

**पदवीचे शिक्षण सुरू असताना विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन देणे, त्यासाठी निधी देणे या योजना सुरू करणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील पहिले व एकमेव विद्यापीठ आहे. पदवीसोबत संशोधन योजना विद्यार्थ्यांना संशोधनाकडे वळवण्यास उपयुक्त ठरत आहे.**

– **डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# संविधान दिनानिमित्त विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने भारतीय संविधान दिनानिमित्त सोमवार, दि. २६ रोजी प्राचार्य डॉ. हरिश भालेराव यांचे 'भारतीय संविधानातील मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी १०.३० वाजता व्याख्यान होईल. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती असेल. विद्यार्थी, शिक्षक, तसेच जिज्ञासूंनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2018
Times of India

# WHEN THE SUN GOES DOWN

Piyush Bhusari



SUK students enjoy a sunset view near the artificial lake on the campus. The atmosphere was dry on Thursday with the maximum temperature at 32 degrees celsius and the minimum at 18 degrees celsius